## वाघाटी

*Capparis zeylanica* Family: **Capparaceae**

**विविध भाषां मधील नावे:** मराठी: वाघाटी, गोविंदफळ, गोविंदी; हिंदी: अरदांडा; संस्कृत: व्याघ्रनखी, करम्भ, तपसप्रिय; इंग्लिश: Ceylon Caper, Indian Caper





**Morphology**:

Straggling shrubs. Leaves acute or obtuse with twisted callous tip. Flowers showy, 3-5 cm across in supra-axillary rows of 2-6 flowers, developing before leaves. Petals white with reddish spot. Stamens 30-50, creamy white, turning to pink before dark. Fruits globular. Seeds many.

**वनस्पतीचे वर्णन:**

वाघाटीची काटेरी वेल मोठया वृक्षावर चढते व पसरते. याला जाड, वाकडे व कठीण काटे जोडी-जोडीने असतात. पाने २ ते ३ इंच लांबीची व १ इंच रुंदीची,चकचकीत, हिरवी व थोडे टोक असणारी असतात. याला पांढरी, तुर्ऱ्यानी येणारी व लांब नरकेसर येणारी (तंतुमय) फुले असतात. त्याला उग्र गंध असतो. याच्या फुलावर भरपूर फुलपाखरे असतात.या वेलीला लांबट गोल आकाराची मोठ्या बोराएवढी फळे येतात. या कोवळ्या फळांची भाजी करतात.

**बहर येण्याचा कालावधी:** फेब्रुवारी ते एप्रिल

**औषधी उपयोग:**

याचे मूळ औषधामध्ये वापरतात. मुलांची लाळ जास्त प्रमाणात गळत असेल तर वाघाटीचे मूळ उगाळून चाटण करण्यास दयावे. वाघाने ओरबडल्यावर पाने चटनी सारखी वाटून रसासाहित ओरखाड्यांवर लावावे. वाघाटी उष्ण, उत्तेजक, असून पित्तनाशक आहे. वाघाटीचे फळ कफ, वायू

यांचा नाश करते. फळ उगाळून पाण्यातून पोटदुखीवर इलाज म्हणून पिण्यासाठी देतात. वाघाटी क्षयरोगावर अप्रतिम औषध आहे.

**लागवड व पद्धत:**

वाघाटी ची लागवड सहसा केली जात नाही. याची झाडे शेताच्या बांधावर किंवा माळरानावर निसर्गतः येतात. औषधी साठी लागणारे वनस्पतीचे भाग किंवा भाजी साठी फळे निसर्गामधूनच मिळवली जातात. रोपे तयार करण्यासाठी बियांचा उपयोग केला जातो. लहान ट्रे किंवा पिशव्यांमध्ये बिया रुजवल्या जातात. बिया लवकर रुजण्यासाठी संप्रेरकांचा वापर केला जातो.